# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही- ४४१ २२२

## कृषि हवामान सल्ला पत्रक

## चंद्रपूर जिल्हा

**क्र.कृ.ह.स./८९/कृ.सं.के./७३७/२०२४** **दिनांक ०५ नोव्हेंबर २०२४**

| सिंदेवाही येथील मागील आठवड्यातील हवामान स्थिती दिनांक २९ ऑक्टोबर ते ०४ नोव्हेंबर २०२४ | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसाचा हवामान अंदाज दिनांक ०६ ते १० नोव्हेंबर २०२४ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९/१० | ३०/१० | ३१/१० | ०१/११ | ०२/११ | ०३/११ | ०४/११ | दिनांक | ०६/११ | ०७/११ | ०८/११ | ०९/११ | १०/११ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| ३३.० | ३२.५ | ३२.५ | ३३.० | ३३.५ | ३३.० | ३२.५ | कमाल तापमान (अं.से.) | ३३.६ | ३३.५ | ३३.४ | ३३.२ | ३३.६ |
| २५.० | २४.५ | २४.५ | २५.० | २१.० | २३.० | २२.० | किमान तापमान (अं.से.) | १९.२ | १९.३ | १९.४ | १९.२ | १९.३ |
| ८७ | ८८ | ९१ | ९२ | ९३ | ९१ | ९३ | सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ६९ | ७० | ७७ | ८० | ७८ |
| ४१ | ४२ | ५२ | ५५ | ३१ | ४१ | ४१ | दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ३८ | ३८ | ३९ | ४० | ३९ |
| ०.०१ | ०.१ | ०.०२ | ०.०३ | ०.०२ | ०.०१ | ०.०१ | वा-याचा वेग (किमी/तास) | ४ | ४ | ६ | ५ | ५ |
| आंशिक ढगाळ | आंशिक ढगाळ | ढगाळ | ढगाळ | आंशिक ढगाळ | आंशिक ढगाळ | आंशिक ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र |

| पाऊस (मिमी) मागील आठवड्यातील | पाऊस (मिमी) ०१/०६/२०२४ पासून आजपर्यंत |
|---|---|
| ०.० (०) | १८०२.२ (६३) |

| हवामान अंदाज | भारतीय हवामान विभाग,प्रादेशिक हवामान केंद्र,नागपूर च्या जिल्हास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार चंद्रपूर जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसात ०६ ते १० नोव्हेंबर २०२४ रोजी आकाश निरभ्र राहून कमाल तापमान ३३.२ ते ३३.६ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १९.२ ते १९.४ अंश सेल्सिअस राहून कोरडे हवामान राहण्याची अधिक शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. |
|---|---|

| पिकांचे नाव | पिकाची अवस्था | शेतकऱ्यांना हवामान आधारीत कृषि सल्ला |
|---|---|---|
| सामान्य सल्ला | | ➢ पुढील पाच दिवस वातावरण कोरडे राहण्याची शक्यता असून शेतकरी बंधूनी खरीप पिकाची कापणी व मळणी झाल्यानंतर जमीन नांगरून, वखरून रब्बी पिकांसाठी शेत तयार करावे.<br>➢ रब्बी हंगामातील पिकाच्या बियाण्यास पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी.<br>➢ परिपक्व अवस्थेतील धान व इतर खरीप हंगामातील परिपक्व अवस्थेतील पिकांची काढणी व मळणी ची कामे २-३ दिवसात स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती असताना करावी. |
| गहु | पेरणी | ➢ कोरडवाहू गहू पेरणीकरिता हेक्टरी ७५ किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे त्याकरिता एकेडीडब्लू २९९७-१६ (शरद), पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२), एमएसीएस १९६७ आणि एनआय ५४३९.<br>➢ पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२) या वाणाची मर्यादित ओलीत उपलब्ध परिस्थितीमध्ये निवड करून पेरणीकरिता हेक्टरी ७५ किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे.<br>➢ बागायती गहू वेळेवर पेरणीसाठी हेक्टरी १०० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे त्याकरिता एकेडीडब्लू १०७१ (पूर्णा), एकेडीडब्लू ३७२२ (विमल), (एचडी २१८९ हेक्टरी १२५ किलो बियाणे) या वाणाची निवड करावी.<br>➢ पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम किंवा व्हिटावाक्स ७५ टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी २.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया केल्यानंतर १० किलो बियाण्यास अझाटोबॅक्टर २५० ग्रॅम व स्फुरद विरघडणारे जिवाणू खत (पि. एस. बी.) २५० ग्रॅम या जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी.<br>➢ पेरणीच्या वेळी बियाणे ५ सें. मी. पेक्षा खोल पडणार नाही याची काळजी घावी. पेरणीसाठी दोन ओळीतील अंतर २३ सें. मी.ठेवावे. पेरणीच्या वेळी ४० किलो नत्र व २० किलो स्फुरद प्रति हेक्टरी द्यावे. |
| हरभरा | पेरणी | ➢ हरभरा पिकाचे पेरणी करिता देशी वाण आणि बियाणे दर- हिरवा चाफा (एकेजीएस- १), विजय आणि आयसिसिव्ही- १० (५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर), पिकेव्ही हरिता (एकेजी- ९३०३- १२) आणि जाकी ९२१८ (७५- ८५ किलो बियाणे प्रती हेक्टर बियाणे),<br>➢ काबुली वाण आणि बियाणे दर पिकेव्ही काबुली- २ आणि पिकेव्ही काबुली- ४ (११०- ११५ किलो बियाणे प्रती हेक्टर), गुलाबी हरभरा वाण गुलक- १ (७५-८५ बियाणे प्रती हेक्टर) या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५- ३० नोव्हेंबर पर्यंत पेरणी करावी. पिकेव्ही कांचन (एकेजी- १९०९) या वाणाची ५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर पर्यंत करावी.पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम + स्फुरद विरघडणारे जिवाणू खत (पि. एस. बी. ) २५ ग्रॅम + रायझोबीयम २५ ग्रॅम याप्रमाणात या जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी.<br>➢ पेरणीच्या वेळी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद प्रति हेक्टरी द्यावे. |
| जवस | पेरणी | ➢ पेरणीसाठी २५ किलो प्रति हेक्टरी बियाणे एनएल ९७ किंवा पिकेव्ही एनएल २६० वाणांचा वापर करावा. कोरडवाहू पिकाच्या पेरणीसाठी २५:२५:०० तसेच बागायती पिकास ३०:३०:०० किलो नत्र / स्फुरद प्रति |

| | | |
|---|---|---|
| | | हेक्टरी द्यावे.<br>➢ पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करावी. |
| करडी | पेरणी | ➢ कोरडवाहू करडी पिकाची पेरणी ऑक्टोबर महिन्यात करून घ्यावी त्याकरिता एकेएस-२०७ ,भीमा ,नारी-६ पिकेव्ही पिंक या वाणाचा वापर करावे व बियाण्याचे प्रमाण प्रती हेक्टरी १० किलो प्रमाणे पेरावे.<br>➢ पेरणी पूर्वी बियाण्यास अझाटोबॅक्टर अधिक पीएसबी जीवाणू संवर्धक प्रत्येकी २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाण्यास बीज प्रक्रिया करावी व ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास बीज प्रक्रिया करावी. बीज प्रक्रिया केल्यानंतर तासभर सावलीत सुकवावे आणी पेरणी करावे.<br>➢ पेरणीच्या वेळेस ८७ किलो युरिया+१५६ किलो सिंगल सुपर फॉस्फेट प्रती हेक्टरी द्यावे. |
| मोहरी | पेरणी | ➢ मोहरी पेरणीसाठी ५ किलो प्रति हेक्टरी बियाणे शताब्दी (एसीएन-९) किंवा एनआरसीएचबी-१०१ या वाणांचा वापर करावा. ओलिताची सोय असल्यास पिकास ५०:४०:०० किलो नत्र / स्फुरद प्रति हेक्टरी रासायनिक खते द्यावे.<br>➢ पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करावी. |
| धान | लोंबी/ दाणे पक्क्वता | ➢ उशिरा येणाऱ्या धान पिक वाणांची भेसळ लोम्बी (लांबोर) काढून टाकावे.<br>➢ उशिरा येणाऱ्या धान पिकाची पक्वतेनुसार कापणी जमिनीलगत करावी. कापलेले पिक उन्हात वाळवल्यानंतर पेंढ्या बांधून मळणीसाठी खळ्यावर रचून ठेवावे व मळणी करावी.<br>➢ लवकर येणाऱ्या धान पिक वाणांची भेसळ लोम्बी (लांबोर) काढून टाकावे.<br>➢ ढगाळ वातावरण व वाढत्या आद्रतेमुळे तपकीरी तुडतुडे यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे तरी धान पिकात प्रति चुड ५ ते १० तपकीरी तुडतुडे दिसताच त्यांच्या नियंत्रणासाठी बुप्रोफेजीन २५ टक्के प्रवाही १६ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एस.एल. २.२ मिली किंवा फिप्रोनील ५ एस सी २० मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| तूर | फुल अवस्था | ➢ ढगाळ वातावरणामुळे पाने खाणाऱ्या अळींचा प्रादुर्भाव आढळून आल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी.<br>➢ तूर पिकात हेलीकोव्हर्पा अळीच्या सर्वेक्षणासाठी प्रति हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत.<br>➢ तूर पिकात पक्षी थांबे उभारावेत. |
| कापूस | फुल ते बोन्डे अवस्था | ➢ वेळेवर पेरणी केलेले कपाशी पिक वेचणीला आले आहे तरी शेतकरी बंधूनी कापूस वेचतांना प्रतवार व वाण प्रत वेचून त्याची सुकलेल्या ठिकाणी सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावे.<br>➢ पीक बोन्डे भरण्याचे अवस्थेत असतांना २ टक्के डिएपी (२०० ग्रॅम डिएपी + १० लिटर पाणी) त्याचबरोबर फुल पाती गळ थाबंन्याकरिता प्लंनोफिक्स ५ मि.ली. मिसळून फवारणी करावी.<br>➢ ढगाळ वातावरणामुळे रसशोषण करणाऱ्या (मावा, तूडतूडे) किडींचा प्रादूभाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा व्हीटीसीलीयम जलकॅनी ४० ग्रॅम किंवा ॲजसटामाजप्रड २० टक्के ६० ग्रॅम किंवा डायजमथोएट ३० टक्के २६० मिली प्रति एकर पावसाची उघाड बघून फवारणी करावी.<br>➢ शेंदरी बोडअळीच्या निरीक्षणासाठी प्रति हेक्टरी ८ कामगंध सापळे लावावेत. डोमकळी आढळल्यास नेहमीत दर आठवड्यांनी अळीसहित वेचून नष्ट करावे.<br>➢ जिथे ५ टक्के च्यावर नुकसान झाले असल्यास तिथे प्रोफेनॉफॉस ५० टके ईसी ३० मि. ली. किंवा क्लोरोपायरीफॉस ५० टके ईसी २० मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| वांगे | रोपांची पुनर्लागवड | ➢ वांग्याचे रोपे ४ ते ६ आठवड्याचे झाले असल्यास वांगी रोपांची पुनर्लागवड डायमिथोएट १ मि.ली.+आक्रोमायसीन ०.५ ग्रॅम प्रती लिटर पाण्याचा द्रावणात रोपे ५ मिनिटे बुडवून सरी वरंबा पद्धतीने ७५ x ६० सेमी किंवा ७५ x ७५ सेमी अंतराने करावी.<br>➢ प्रती हेक्टरी ६० किलो नत्र अधिक ५० किलो स्फुरद दयावे त्यापैकी अर्धा नत्र पूर्ण स्फुरद लागवडी सोबत दयावे राहिलेला अर्धा नत्र लागवडीनंतर ३० दिवसाने दयावे व लगेच पाणी सोडावे. |
| टोमाटो | रोपांची पुनर्लागवड | ➢ टोमाटो पिकाचे रोपे ४ ते ६ आठवड्याचे झाले असल्यास रोपांची पुनर्लागवड सरी वरंबा पद्धतीने ६० x ६० सेमी किंवा ७५ x ६० सेमी अंतराने करावी.<br>➢ प्रती हेक्टरी ७५ ते १०० किलो नत्र व ६० किलो फॉसफरस व ५० किलो पोट्याश दयावे व त्यापैकी अर्धा नत्र पूर्ण स्फुरद व पालाश लागवडी सोबत दयावे राहिलेला अर्धा नत्र लागवडीनंतर ३० दिवसाने दयावे व लगेच पाणी सोडावे. |
| पशुपालन सल्ला | | ➢ जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी रात्रीच्या वेळी जनावरांना गोठ्यामध्ये/सुरक्षित ठिकाणी ठेवावे. जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी ४ ते ६ इंच जाडीचे भाताचा पेंढा, गव्हाचा पेंढा, करावातीचे धूळ इत्यादीचे बेडिंग करावे. जनावरांच्या गोठ्याचा व जमिनीचा भाग कोरडा व स्वच्छ ठेवावा.<br>➢ जनावरांना पिण्यासाठी २४ तास स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी. जनावरांच्या पाण्याची कुंड/ साधने याची आठवड्यातून एकदा स्वच्छता करावी.<br>➢ रब्बी हंगामात घेणा-या पशुधनासाठी मका, ओट, बरशीम लसून घास व ज्वारी चारा पिकाची लागवड करावी. |

| | |
|---|---|
| कुक्कुटपालन सल्ला | ➢ कुक्कुट्पालनामध्ये थंडीच्या दिवसात पक्षांना उबेची आवश्यकता जास्त असते म्हणुन पिवळ्या प्रकाशाच्या बल्बची संख्या किंवा आवश्यकतेनुसार जमिनीपासुन उंची बदलवत रहावी तसेच शेडला गोणपाट/पोत्यांचे पडदे लावून थंडीपासून संरक्षण करावे.<br>➢ कोंबड्यांच्या घरामध्ये हवा नेहमी खेळती असावी. थंड किंवा गरम हवेचा झोत सरळ त्यांच्यावर येऊ देऊ नये. |

- हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी.

.शेतकरी बंधुनो सप्रेम नमस्कार, वर्ष २०२४ मधील ग्रामीण कृषि मौसम सेवा सल्ला पत्रक नोंदणीसाठी आपले नाव, गाव,पत्ता, मोबाईल नंबर इत्यादी माहिती ई-मेल aassindewahi@gmail.com किवा मोबाईल नंबर ९६२३३६०३२७ वर संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| | प्रकल्प समन्वयक<br>ग्रामीण कृषि मौसम सेवा, कृषि संशोधन केंद्र,<br>सिंदेवाही जि. चंद्रपूर |